| CNRNo.MHWR040009902020 | | | |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | – | ०३/१२/२०२० |
| | दाखल दिनांक | – | ०३/१२/२०२० |
| | निकाल दिनांक | – | १२/०५/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष. म. दि.<br>०५ ०५ ०९ |

**निशाणी क्र.१६**

**नमुना क्र.३२**

**पार्ट-अ**

**(न्यायनिर्णयाची शिर्षक पृष्ठ)**

**फौजदारी नियमावली प्रकरण क्र. ६ चा परिच्छेद ४४ (i)**

| |
|---|
| **<u>सेलु येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात</u>**<br>**ता. सेलु, जि. वर्धा**<br>**(पिठासीन अधिकारी – एस.आर.सातभाई)**<br>न्यायनिर्णय घोषीत दिनांक १२/०५/२०२६<br>**(नियमित फौजदारी खटला क्र.१७८/२०२०)** |
| गुन्हा नोंद क्र.१४२/२०२०, पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे, ता.सेलू, जि.वर्धा |

| | | |
|---|---|---|
| **<u>अभियोग पक्ष</u>** | | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे. |
| **<u>अभियोग पक्षातर्फे</u>** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता –<br>श्रीमती व्ही.एम.गजभिये |
| **<u>आरोपी</u>** | १. | **संजय नारायण बावणे,**<br>वय – ३५ वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>रा. – धानोली(साकोली), ता. समूद्रपूर, जि. वर्धा. |
| **<u>आरोपी तर्फे विधीज्ञ</u>** | | श्री. बी.डब्लू.चौधरी |

**<u>भाग – ब</u>**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | ०६/०८/२०२० |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :- | ०७/०८/२०२० |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ०३/१२/२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०८/०८/२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | ०८/०८/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १२/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशांचा दिनांक | :- | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (**Set Off**) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संजय नारायण बावणे | ३१/०८/२०२० | ३१/०८/२०२० | भा.दं.वि. ३२४, ५०४ व ५०६ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग –क

### (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))

### सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार.

अ. अभियोग पक्ष

| सा. | साक्षीदारांचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | गौतम पांडुरंग कोठारे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ०५ |
| २. | अमोल सुरज देशमुख | घटनास्थळ पंच साक्षीदार | ०६ |
| ३. | अंकुष मारोती बावणे | फिर्यादी | ११ |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार –

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

न्यायालयीन साक्षीदार –

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

ब. बचाव पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

क. न्यायालयामार्फत निशाणी फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा.

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.०७ | साक्षीदार क्र.२ ची घटनास्थळ पंचनामावरील सहीला |
| २. | निशाणी क्र.०८ | साक्षीदार क्र.२ ची जप्ती पंचनामावरील सहीला |
| ३. | निशाणी क्र.१२ | फिर्यादीची तक्रारवरील सहीला |
| ४. | निशाणी क्र.१३ | फिर्यादीची छापील प्रथम खबरी अहवालावरील सहीला |
| ५. | निशाणी क्र.१४ | घटनास्थळ पंचनामा |
| ६. | निशाणी क्र.१५ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

ड. भौतीक वस्तु -

| अनु क्रमांक | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | ४२/२०२० | एक वेळवाची लाकडी काठी ३ खडे असलेली |

# न्यायनिर्णय

**(घोषीत दिनांक : १२/०५/२०२६)**

अभियोगपक्षाने सदर खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ५०४ व ५०६ अंतर्गत दाखल केला आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे –**

२. दि.०६/०८/२०२० रोजी सकाळी १०.०० वाजता फिर्यादी हे काही कामानिमित्य घरुन बाहेर दुकानाकडे रोडने जात होते. तेव्हा त्यांचे वडिलांच्या चुलत भाऊ आरोपी संजय बावणे हा फिर्यादी यांच्या कडे आला व फिर्यादीला शिवीगाळ करुन,"तु दुकानाकडे कशाला आला तु बायको आणि पोराचा हाताचा मार खाते" असे बोलुन फिर्यादीसोबत तोंडातोंडी वाद करु लागला. तेव्हा त्याचे हातात वेळवाची खडे असलेली काडी होती. त्या काडीने फिर्यादीचे कंबरेवर मारत असतांना फिर्यादीने हाताने ती काडी अडवली असता फिर्यादी यांच्या डाव्या हाताच्या करंगळीच्या मधात ती काडी लागली. त्यामुळे फिर्यादी यांच्या बोटाला रक्त लागल्याने व कंबर दुखत असल्याने फिर्यादी हे घरी निघुन गेले. फिर्यादी यांना दिवसभर त्रास असल्याने ते दिवस व रात्री रिपोर्ट देण्यास गेले नाही. आरोपी हा नेहमीच त्यांना रस्त्यात भेटल्यावर शिवीगाळ करुन मारण्याची धमक्या देत राहतो. आरोपी विनाकारण फिर्यादी यांना चिडवितो व शिवीगाळ करतो म्हणून फिर्यादीने आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथे तक्रार दिली. सदरची तक्रार पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथे अपराध

क्र.१४२/२०२० भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

३. तपासकामी तपासी अधिकारी श्री. प्रकाश मैंद यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला, मुद्देमाल एक वेळवाची लाकडी काठी तीन खडे असलेली जप्त केले. वैद्यकीय प्रमाणपत्र, क्वेरी रिपोर्ट हस्तगत केले. आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने, त्याचे विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपीविरुद्ध दोषारोप निश्चीत करुन त्यातील मजकूर आरोपीला वाचून दाखविला व त्याला मराठी भाषेमध्ये समजावून सांगण्यात आला. आरोपीने तो अमान्य करुन प्रकरण चालविण्यासाठी विनंती केली. आरोपीविरुद्ध अभियोगपक्षाने नोंदविलेल्या साक्षीपुराव्यातुन गुन्हयाशी संबंधीत कोणताही मजकूर अभिलेखावर आला नाही, त्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) (ब) नुसार बयान नोंदविण्यात आले नाही. प्रस्तुत प्रकरणात विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये तसेच आरोपीतर्फे विद्वान वकील बी.डब्लू.चौधरी यांच्या युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. अभियोगपक्षाचे म्हणणे विचारात घेता, खालील बाबी विचारार्थ येत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो आहे काय दिनांक ०६/०८/२०२० रोजी १०.०० ते १०.३० वाजताच्या दरम्यान मौजा धानोली, समूद्रपूर, तालुका समूद्रपूर व जिल्हा वर्धा येथे आरोपीने फिर्यादी नामे अंकुष मारोती बावणे यांचे सोबत वाद घालुन त्यांना काडीने कंबरेवर व डाव्या हाताच्या करंगळीवर मारहाण करुन त्यांना इच्छापूर्वक दुखापत केली, जे हल्लयाचे हत्यार म्हणून वापरल्यास मृत्यु होण्याची शक्यता आहे, त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | **नकारार्थी** |
| २. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचा अपमानकरुन त्यायोगे प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा अन्य कोणताही अपराध घडेल अश्या उद्देशाने शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला, म्हणून आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ अन्वये गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली, म्हणून आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे आरोपी निर्दोष मुक्त.** |

## ...कारणमिमांसा...

६. अभियोगपक्षाने आरोपीवरील गुन्हे सिद्ध करण्यासाठी आरोपीने फिर्यादीसोबत वाद घालुन त्यांना काडीने कंबरेवर व डाव्या हाताच्या करंगळीवर मारहाण करुन त्यांना इच्छापूर्वक दुखापत केली, आरोपीने

फिर्यादीचा अपमानकरुन त्यायोगे प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा अन्य कोणताही अपराध घडेल अश्या उद्देशाने शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला, हे सिद्ध करणे आवश्यक आहे तसेच आरोपीने फिर्यादीच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली, हे सिद्ध करणे आवश्यक आहे.

**मुद्दे क्र.१ ते ३ करीता :**

७. अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी साक्षीदार क्र.१ गौतम पांडुरंग कोठारे (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार) यांची साक्ष निशाणी क्र.०५ वर नोंदविण्यात आली आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, ते आरोपीला व फिर्यादीला ओळखते. ते त्यांच्या गावातील रहवासी आहे. त्यांना घटनेबाबत काहीही माहित नाही. त्यांच्या समक्ष कोणतीही घटना घडली नाही. पोलीसांनी त्यांना घटनेबाबत विचारपूस करुन त्यांचा जबाब नोंदविला नाही. सदरचा साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने त्याचा उलटतपास नोंदविला. परंतु त्याच्या उलटतपासात ही कोणतीही उपयुक्त साक्ष आरोपीविरुद्ध आलेली नाही.

८. अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी साक्षीदार क्र.२ अमोल सुरज देशमुख (घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार) यांची साक्ष निशाणी क्र.०६ वर नोंदविण्यात आली आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, दि.०९/०८/२०२० रोजी

पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्यासाठी कुठेही बोलविले नव्हते. त्यांच्या समक्ष पंचनामा करण्यात आलेला नाही. त्यांची एका कागदांवर सही घेण्यात आली होती. त्यांना सदरचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे सांगितले. दि.३१/०८/२०२० रोजी पोलीसांनी त्यांच्या समक्ष काहीही जप्त केले नाही. त्यांना सदरचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे सांगितले. सदरचा साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे न्यायालयाचा परवानगीने सरकारी वकिलांनी त्यांचा उलटतपास घेतला. परंतु अभियोगपक्षास साक्षीदाराचा उलटतपासात आरोपीविरुध्द उपयुक्त असा कोणताही मजकूर अभिलेखावर आणता आला नाही. त्यामुळे साक्षीदाराची साक्ष आरोपीवरील गुन्हा शाबित करण्यास पुरेशी नाही.

९. शेवटी अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी साक्षीदार क्र.३ अंकुष मारोती बावणे (फिर्यादी) यांची साक्ष निशाणी क्र.११ वर नोंदविलेली आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, ते आरोपीला ओळखते. तो त्यांच्या शेजारी राहते. त्यांच्यामध्ये किरकोळ वाद झाला होता. त्यावरुन त्यांनी आरोपीच्या विरुद्ध रागाने फिर्याद दिली होती. त्यांना सदरची फिर्याद व छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आली. त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे कथन केले. सदरचे साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे न्यायालयाचा परवानगीने

सरकारी वकिलांनी त्यांचा उलटतपास घेतला. परंतु त्यामध्ये साक्षीदाराने सर्व प्रतिकुल सूचना नाकारलेले आहे.

१०. उपलब्ध साक्षपुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच आरोपीने फिर्यादी सोबत वाद घालुन त्यांना काडीने कंबरेवर व डाव्या हाताच्या करंगळीवर मारहाण करुन त्यांना इच्छापूर्वक दुखापत केली, तसेच फिर्यादीचा अपमानकरुन त्यायोगे प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा अन्य कोणताही अपराध घडेल अश्या उद्देशाने शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला तसेच फिर्यादीच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली असे फिर्यादीने तसेच इतर साक्षीदारांने सांगितले नाही. त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे कोणती घटना घडली होती यावर विश्वास बसत नाही. जरी प्रस्तुत प्रकरणात घटनास्थळ पंचनामा व वैद्यकीय प्रमाणपत्र आरोपीने मान्य केले असले तरी सदरचा गुन्हा सिध्द होण्याकरिता फिर्यादीने साक्ष दिलेली नाही. त्यामुळे घटना घडली होती किंवा नाही असे ठामपणे म्हणता येणार नाही. तसेच अभियोगपक्ष साक्षीदार क्र.२ ने त्यांच्या साक्ष पुराव्यात सांगितले आहे की, त्यांना पोलीसांनी पंचनामा करण्याकरिता कुठेही बोलविले नाही. त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा करण्यात आलेला नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा हे सिद्ध झालेले नाही. अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन ते फितुर

झाल्याचे दिसते. त्याचप्रमाणे फिर्यादीने अभिलेखावर पुरसीस (निशाणी क्र.०९) दाखल करुन सांगितले आहे की, त्यांच्यात व आरोपीमध्ये आपसी समझोता झाल्यामुळे त्यांना आरोपीविरुद्ध प्रकरण चालवायचे नाही. त्याचप्रमाणे अभियोगपक्षाने तपासी अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे आरोपीविरूध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीने भा.दं.वि.चे कलम ३२४, ५०४ व ५०६ नुसार गुन्हा केल्याची बाब सिध्द झालेली नाही. वरील विवेचनावरुन मी मुद्दे क्र.१ ते ३ चे नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ बाबत :**

**११.** उपरोक्त पुराव्याचे विश्लेषण करता व एकंदर कायदेविषयी परिस्थितीचा बारकाईने विचार करता, अभियोग पक्ष आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. सबब, उपरोक्त गुन्हयातून साक्षपुराव्या अभावी संशयाचा फायदा देउन आरोपीची निर्दोष मुक्तता करणे मला न्यायोचित वाटते. परिणामत: मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे **संजय नारायण बावणे** याची भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१)] अन्वये गुन्हा क्र.१४२/२०२० भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६ पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे, या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जमानतनामा व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

**३.** अपराध क्रमांक १४२/२०२० मध्ये जप्त मुद्देमाल एक वेळवाची लाकडी काठी तीन खडे असलेली ही मुल्यहिन असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर कायदेशिररित्या नष्ट करण्यात यावी.

**४.** आरोपीने रक्कम रु. १५,०००/- चा वैयक्तीक मुचलका भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ] प्रमाणे दाखल करुन पुर्तता करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.05.12 15:49:51 +0530

(एस.आर.सातभाई)

**दिनांक** : १२/०५/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सेलू

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)